

मडगाव मासळी बाजारात सोपो कलेक्शनवरुन तणाव

» पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड




फ्रेंच ओपनमध्ये राफेल नदालला भावनिक निरोप

» पान ४ वर

वेर्णा, रविवार, २२ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 290 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 22 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### रेल्वेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा काम मिळणार

**नवी दिल्ली, दि. २१ :** रेल्वे बोर्डाने आता एक मोठा निर्णय घेतला आहे . निवृत्त कर्मचाऱ्यांना रेल्वेमधील नॉन–राजपत्रित म्हणजेच लहान पातळीवरील रिक्त पदे भरण्यासाठी कंत्राटी पद्धतीने पुन्हा नियुक्त करता येईल . यामुळे रेल्वेचे कामकाज सुधारेल आणि अनुभवी कर्मचाऱ्यांनाही आणखी एक संधी मिळेल.

आतापर्यंत नियम असा होता की कोणताही निवृत्त कर्मचारी ज्या पदावरून निवृत्त झाला त्याच पदावर पुन्हा काम करू शकत होता . म्हणजेच, तो ज्या पदावरून निवृत्त झाला त्याच वेतन पातळीवर त्याला पुन्हा कामावर ठेवता येत होते . आता रेल्वेने हा नियम शिथिल केला आहे.

निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन स्तर–१ ते वेतन स्तर–९ पर्यंतच्या रिक्त पदांवर पुन्हा नियुक्त केले जाऊ शकते .

आता कोणताही निवृत्त कर्मचारी त्याच्या निवृत्ती पदापेक्षा तीन पातळी खाली असलेल्या पदावरही पुन्हा काम करण्यासाठी अर्ज करू शकतो .

उदाहरणार्थ, जर एखादा कर्मचारी वेतन श्रेणी–६ वरून निवृत्त झाला असेल, तर त्याला श्रेणी–६, श्रेणी–५, श्रेणी–४ आणि श्रेणी–३ पर्यंतच्या पदांसाठी निवडता येते. रेल्वेने असेही स्पष्ट केले आहे की ज्यांनी त्याच स्तरावरून निवृत्ती घेतली आहे त्यांना देखील प्राधान्य दिले जाईल, म्हणजेच ज्या स्तरावर पद रिक्त आहे त्या स्तरावरून निवृत्त झालेल्या व्यक्तीला प्रथम संधी मिळेल. जर असे लोक उपलब्ध नसतील तर फक्त उच्च स्तरावरून निवृत्त झालेल्या लोकांनाच संधी मिळेल.

आता विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांना विभागीय स्तरावर निवृत्त कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा अधिकार असेल.

### ईडीला दिल्लीत आढळला नवा 'क्लासरुम घोटाळा'

**नवी दिल्ली, दि. २१ :** दिल्लीतील कथित दारुवरील अबकारी कर घोटाळ्यामुळे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया आणि कॅबिनेट मंत्री सत्येंद्रनाथ जैन यांना ईडीने तुरुंगात धाडले होते. पण आता पुन्हा एकदा मनिष सिसोदिया आणि सत्येंद्रनाथ जैन यांना ईडीने समन्स पाठवले आहे. यावेळी ईडीला २००० कोटींचा नवा घोटाळा आढळला असून हा क्लासरुम घोटाळा' असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शुक्रवारी एसीबीने मनीष सिसोदिया यांची तीन तासांहून अधिक वेळ चौकशी केली. सिसोदिया सकाळी ११ वाजता एजन्सीसमोर हजर झाले आणि दुपारी २:३० च्या सुमारास निघून गेले.

या २००० कोटी रुपयांच्या या दिल्ली क्लासरुम बांधकाम घोटाळा' प्रकरणी १८ जून रोजी अंमलबजावणी संचालनालयाने अर्थात ईडीने दिल्लीतील ३७ ठिकाणी शोधमोहीम राबवली. मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२च्या तरतुदींनुसार ही शोधमोहीम राबविण्यात आली. दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेने याप्रकरणी मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन आणि इतरांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ही चौकशी सुरू करण्यात आली आहे. दिल्ली सरकारच्या पीडब्ल्यूडीने २०१५ ते २०२३ दरम्यान १२,७४८ हून अधिक अतिरिक्त वर्गखोल्यांच्या बांधकामात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा ईडीने दावा केला आहे. ईडीच्या मते, २,४०५ वर्गखोल्यांची आवश्यकता असताना, योग्य मंजुरीशिवाय प्रकल्पाची व्याप्ती मनमानीपणे वाढवून आधी या खोल्या ७,१८० आणि नंतर १२,७४८ खोल्यांपर्यंत वाढविण्यात आली. यामुळे प्राधान्यक्रम १ आणि प्राधान्यक्रम २ या टप्प्यांमधील खर्चात ४९.०३ टक्क्यांपर्यंत लक्षणीय वाढ झाली आहे. याप्रकरणी केलेल्या छापेमारीत ईडीने खाजगी कंत्राटदारांकडून या घोटाळ्याचे पुरावे जप्त केले, ज्यात दिल्ली सरकारच्या मूळ विभागीय फायली आणि पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांचे रबर स्टॅम्प यांचा समावेश असल्याचं म्हटलं आहे.

# २.६ कोटींच्या सायबर फसवणूक प्रकरणी मुख्य आरोपीला अटक

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २१ : २.६ कोटी रुपयांहून अधिक रकमेची सायबर फसवणूक केल्याप्रकरणी गोवा सायबर क्राइम पोलिसांनी केरळमधून एका प्रमुख आरोपीला अटक केली आहे. या गुन्ह्यात आरोपीने ' ट्राय' आणि सीबीआय अधिकाऱ्यांची नक्कल करत पीडित महिलेला मानसिक दबावाखाली आर्थिक व्यवहार करायला भाग पाडले होते.**




सायबर क्राइम पोलिस स्टेशनने ९ जून रोजी मडगावच्या आके रोड येथील एका महिलेकडून प्राप्त झालेल्या लेखी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला होता. तक्रारीनुसार, २० मे ते २ जून २०२५ या कालावधीत पीडितेला विविध मोबाईल क्रमांकांवरून फोन कॉल्स आणि व्हॉट्सप संदेश आले. आरोपीने स्वत:ला ट्राय आणि सीबीआय मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत तिच्या नावावर आणि आधार क्रमांकावर पोलिस तक्रार दाखल झाल्याचा खोटा दावा केला.

▶ **गोवा सायबर क्राइम पोलिसांची धडक कारवाई**

▶ **९ जूनपासून सुरू होता तपास**

त्यानंतर आरोपीने सर्वोच्च न्यायालयाचा बनावट आदेश पीडितेला दाखवून तिला वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये एकूण २ कोटी ६० लाख ३३ हजार ६३४ ₹ इतकी रक्कम ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.

पान २ ▶



## सोमवारपासून साओ टोम व फोंतेनहासमध्ये निरीक्षकांची नियुक्ती

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :** साओ टोम व फोंतेनहाज या ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या भागात पर्यटकांच्या अनियंत्रित वर्तनामुळे वाढत्या स्थानिक अस्वस्थतेला उत्तर म्हणून, पणजी म्हापालिकेने सोमवारपासून या भागात विशेष निरीक्षक तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असले तरी, या परिसरात भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही पर्यटकांनी स्थानिकांच्या भावना समजून घेत सहकार्याची भूमिका दर्शवली, तर काहींनी महापालिकेच्या भूमिकेला अत्यधिक' म्हणत तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या.

बेंगळुरूहून गोवा भेटीला आलेल्या सुधा यांनी महापालिकेच्या च्या पावलाचं समर्थन करत म्हटलं की, जर पर्यटकांसाठी खास फोटो पॉइंट्स ठरवले, तर ते अधिक उपयुक्त ठरेल. मला स्थानिकांची नाराजी समजते. काही ठिकाणी सीसीटीव्ही लावल्यास वर्तनावर नियंत्रण ठेवता येईल. हा परिसर सुंदर आहे आणि भावी पिढ्यांसाठी तो तसाच जतन होणं आवश्यक आहे.

महाराष्ट्रातून आलेल्या शालिनी यांनी देखील वर्तनाबाबत जाणीव ठेवण्याची गरज व्यक्त केली. काही पर्यटक इतके उत्साहित असतात की, त्यांनी सार्वजनिक शिस्त पाळली पाहिजे, हेच विसरतात. शेवटी हे एक निवासी परिसर आहे, त्यामुळे थोडं भान ठेवणं आवश्यक आहे, असं ती म्हणाली.

दिल्लीहून आलेल्या सुदेश याने सीसीपी च्या कारवाईवर टीका करत सांगितलं की, पर्यटक येथे काही दिवसांसाठीच येतात. जगा आणि जगू द्या' या तत्त्वानेच आपण सर्वांनी वागावं. थोड्या आवाजाचं सहन केलं तर काही बिघडत नाही.मात्र, त्यानेही काही पर्यटक अति उत्साही असल्याचे मान्य केले.

दहा वर्षांपासून गोवा भेट देणाऱ्या राजस्थानातील राधिका यांनी परिसरातील अस्वस्थतेबद्दल चिंता व्यक्त केली. लॅटिन क्वार्टरमध्ये रील बनवणाऱ्या पर्यटकांकडून गोंधळ उडतो. अनेकदा ते रस्त्याच्या मधोमध उभं राहतात, स्थानिकांबद्दल काहीही विचार न करता. मला इथे पूर्वीचा शांत आणि सौंदर्यपूर्ण गोवा पुन्हा पाहायला आवडेल, असं तिनं सांगितलं.

साओ टोम आणि फोंतेनहाज हे भाग त्यांच्या सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे पर्यटकांचे आगमन स्वागतार्ह असले तरी, स्थानिक जीवनशैलीवर होणारा परिणाम सीसीपी च्या दृष्टीने गंभीर आहे. म्हणूनच, पर्यटक आणि रहिवाशांमधील संतुलन राखण्यासाठी सीसीपी ने निरीक्षक तैनात करण्याचा निर्णय घेतला असून, त्याद्वारे पर्यटकांचे वर्तन नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## इस्त्रायलकडून इराणच्या अणुसुविधेवर हल्ला

**तेहरान/जेरुसलेम / वृतसंस्था, दि. २१ :**

इस्त्रायल–इराण दरम्यान सुरू असलेला तणाव अधिक तीव्र झाला असून, इस्त्रायलने इराणच्या इस्फहान येथील अणुसुविधेवर पुन्हा एकदा हवाई हल्ला चढवला आहे. हा हल्ला इराणकडून मध्य इस्त्रायलवर पाच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागण्यात आल्यानंतर काही तासांतच करण्यात आला. यापूर्वी १३ जून रोजी इस्त्रायलने या सुविधेवर प्रथम हल्ला केला होता.

इस्त्रायली लष्कराच्या माहितीनुसार, इस्फहानवरील या कारवाईत सुमारे ५० लढाऊ विमाने सहभागी झाली होती. इस्फहान ही इराणमधील एक महत्त्वाची अणुसंशोधन केंद्र असून येथे युरेनियम रूपांतरण केंद्र आणि अणुइंधन उत्पादन प्रकल्प कार्यरत आहे.

या हल्ल्याबाबत इस्त्रायली

### इराणकडून क्षेपणास्त्रांचा मारा

अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था एएफपीशी बोलताना सांगितले की, आमच्या ऑपरेशनच्या पहिल्या २४ तासांत आम्ही इस्फहानला लक्ष्य केले. रात्रीच्या कारवाईत आमच्या हल्ल्याचे यश अधिक ठसठशीत ठरले असून, अणुसुविधेला गंभीर नुकसान झाले आहे.

इस्त्रायली अधिकाऱ्यांनी हेही स्पष्ट केले की, या कारवाईदरम्यान काही अतिरिक्त लक्ष्यांवर – विशेषतः सेंट्रीफ्यूज उत्पादन स्थळांवरही हल्ले करण्यात आले. या सर्जिकल स्ट्राइकमुळे इराणच्या सेंट्रीफ्यूज उत्पादन क्षमतेला मोठा झटका बसला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सेंट्रीफ्यूज हे युरेनियम समृद्ध करण्यासाठी वापरण्यात येणारे महत्त्वाचे उपकरण असून, ते युरेनियम हेक्साफ्लोराईड वायू फिरवून त्यातील समस्थानिक विभाजित करण्याचे काम करतात.

इस्त्रायलच्या या हल्ल्याच्या प्रत्युत्तरात, इराणने पहाटेच्या सुमारास इस्त्रायलच्या मध्य भागातील तेल अवीव व आसपासच्या भागांवर पाच बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागली. सुमारे २.४० च्या सुमारास हवाई हल्ल्याचे सायरन वाजू लागले. मात्र, इस्त्रायली हवाई संरक्षण प्रणालीने सर्व क्षेपणास्त्रे हवेतच निष्क्रिय केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी एका अपार्टमेंट इमारतीच्या छतावर आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाने काही वेळातच ही आग आटोक्यात आणली.

इस्त्रायली अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, १३ जूनपासून आतापर्यंत इराणने इस्त्रायलच्या दिशेने ४७० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे तसेच सुमारे १,००० ड्रोन पाठवले आहेत.

शनिवारी रात्री, इस्त्रायली गुप्तचर विभागाच्या मार्गदर्शनाखाली हवाई दलाने इस्फहान परिसरात क्षेपणास्त्र लाँचर्स आणि दुहेरी–बॅरल लाँचर्सवर निशाणा साधत यशस्वी कारवाई केली. हे लाँचर्स इस्त्रायलवर हल्ला करण्याच्या तयारीत होते, अशी माहिती लष्करी सूत्रांनी दिली.

दरम्यान, इराणच्या फार्स वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, हल्ल्याच्या ठिकाणी कोणतीही धोकादायक किरणोत्सर्गी सामग्री गळती झाली नसल्याचे प्राथमिक निरीक्षणात स्पष्ट झाले आहे.या संघर्षामुळे पश्चिम आशियातील वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर शांततेसाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत.

## गोव्यात बाल सुरक्षेचा प्रश्न गंभीर; बायलांचो एकवोट' संघटनेचा गंभीर इशारा

### अल्पवयीन पिढी गंभीर सामाजिक आणि मानसिक संकटात सापडण्याचा धोका

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २१ :** राज्यात अल्पवयीन मुलांशी संबंधित त्रासदायक घटनांमध्ये वाढ होत असतानाच, महिला हक्क गट बायलांचो एकवोट' 'ने गोव्यात बाल सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा गंभीर इशारा दिला आहे. संस्थेच्या अध्यक्षा आवदा व्हिएगस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना या परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली.

राज्यातील अनेक पडक्या, देखरेख न केलेल्या वडिलोपार्जित घरांमध्ये सध्या मद्यपान, अंमली पदार्थांचे सेवन आणि अल्पवयीन मुलांचे शोषण होत असल्याच्या घटना वाढत आहेत, असे व्हिएगस यांनी नमूद केले. ही घरे कधी काळी कुटुंबांनी गजबजलेली होती, मात्र आता ती निर्जन पडून आहेत, कारण अनेक गोवेकर परदेशी नागरिकत्व आणि परदेशी करिअरचा पाठलाग करत आहेत, त्यांनी स्पष्ट केले.

अशाच एका घटनेत, एका पडक्या बंगल्यात १५ वर्षीय मुलगी मोठ्या वयाच्या तरुणांसोबत दारूच्या पार्टीत सहभागी असल्याचे निदर्शनास आले. कोणीही तिला तिथे कशी आणि का आली याविषयी विचारले नाही, असे व्हिएगस यांनी सांगितले. त्यांनी या प्रकारावरुन समुदायातील निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.




राज्यातील इतर भागांमध्येही अशीच स्थिती असून, अनधिकृत झोपड्यांमध्ये अल्पवयीन मुले जमत असल्याचे अहवाल आहेत. या ठिकाणांना स्थानिक पातळीवर ब्लॅक स्पॉट्स' असे संबोधले जाते. या ठिकाणी कोणतीही देखरेख न करता मद्यपान, ड्रग्जचा वापर आणि शोषण सुरू असल्याचे व्हिएगास यांनी निदर्शनास आणले.

संस्थेने हीदेखील चिंता व्यक्त केली की वाढदिवसाच्या पार्टींचे स्वरूप बदलून त्या आता मद्यपानाच्या रात्रीच्या कार्यक्रमांमध्ये रूपांतरित होत आहेत, जिथे अल्पवयीन मुले कोणतीही वय पडताळणी न करता बिअर घेत आहेत. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे, आय–पिलसारख्या औषधांचे अल्पवयीन मुलांमध्ये कोणत्याही नियमनाशिवाय विक्री होत असल्याचेही अहवाल समोर आले आहेत.

व्हिएगस यांनी असेही नमूद केले की अनेक पालक, विशेषतः पहिल्या पिढीतील शिक्षित वर्ग, शिस्त लावण्याच्या प्रक्रियेत अनिश्चिततेला सामोरे जात आहेत. मुलांना रागवायचं की नाही? ते चुकीचं वागल्यास कसे समजवायचं ? – या बाबतीत पालक संभ्रमात आहेत. काय चूक होईल याची भीती, हीच अधिक घातक ठरत आहे, असे त्यांनी सांगितले.

बायलांचो एकवोट' 'ने या पार्श्वभूमीवर पालक सहभाग वाढवणे, समुदायातील जागरूकता निर्माण करणे आणि संबंधित यंत्रणांकडून कडक अंमलबजावणी करणे या तीन प्रमुख गोष्टींवर भर देण्याची मागणी केली आहे. आपण शांतता, दुर्लक्ष आणि अनुत्तरदायित्वाला सामाजिक स्वीकारार्हता देऊ शकत नाही, असा स्पष्ट इशारा व्हिएगास यांनी दिला.

या विषयावर तातडीने लक्ष दिले नाही, तर गोव्यातील अल्पवयीन पिढी गंभीर सामाजिक आणि मानसिक संकटात सापडण्याचा धोका आहे, अशी भीती या गटाने व्यक्त केली आहे.